नि.दि. दावा ५६/२०१९.
गंगाधर +१ वि. चरणदास +२.
निशाणी क्र.५१ वरुन पुढे...

<u>**प्रतिवादींतर्फे सा.क.१ यांचा पुढील सरतपास शपथेवर सुरु**</u>.
<u>**प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. एन.एस. हुसैनी यांच्यामार्फत सुरु**</u>.

माझे नाव : चरणदास आडकुजी गेडाम.
वय सुमारे : ६२ वर्ष, व्यवसाय : शेती.
राहणार : चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.

७. मी शपथेवर कथन करतो की माझ्या साक्ष हलफनाम्यातील मजकूर खरा व बरोबर असून माझ्या सांगण्याप्रमाणे तयार करण्यात आला आहे. त्यावर माझी सही आहे.

<u>सरतपास पुर्ण</u>.

<u>**उलट तपास वादींतर्फे विधीज्ञ श्री. एच.टी. पावडे यांच्यामार्फत**</u>.

प्रश्न – वादपत्रातील नमूद दावा शेत क्र.१ आणि दावा शेत क्र.२ या शेती गंगाधर बोधाने आणि मारोती बोधाने यांनी वारलु नागोब मेश्राम यांच्याकडून खरेदीखताने विकत घेतल्या?

उत्तर – मला माहित नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की १९५१ पासून दावा शत क्र.१ व दावा शेत क्र.२ यावर गंगांधर बोधाने आणि मारेती बोधाने यांची वहिती आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की जबदरस्तीने त्यांनी आमच्या कब्जातील शेती घेतली. आम्ही त्यांच्याविरुद्ध त्यांनी जबरदस्तीने शेती घेतल्याबद्दल रिपोर्ट वैगेरे केला नाही.

प्रश्न – तुम्ही ताब्यासाठी अर्ज केला काय?

उत्तर – १९७६ साली दावा केला.

९. हे म्हणणे खरे आहे की दावा शेतीच्या चतुःसीमेला कोणाच्या शेती आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की गंगाधन बोधाने आणि मारोती बोधाने यांनी दावा शेती खरेदी केली असल्यामुळे ते त्या शेतीचे मालक झाले आहे आणि त्यानंतर त्यांचे वारस मालक झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की ते शेत १९५१ साली खरेदी केल्यामुळे त्या शेतीला अदिवासी हस्तांतरणाचा कायदा लागू नाही. हे म्हणणे खरे नाही की वादी हे मालकीहक्काने दावा शेतीची वहिती करीत असल्यामुळे आम्हाला त्यांच्या वहितीला कोणताही अडथळा निर्माण करण्याचा कोणताही अधिकार

नाही. हे म्हणणे खरे नाही की वादींचा दावा खरा आणि कायदेशीर असल्यामुळे आम्हाला वादींकडून हानीपुर्वक खर्च मागण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की जमीनीच्या किमती भरमसाठ वाढल्यामुळे जमीन हडपण्यासाठी मी खोटा साक्षहलफनामा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उ**लट तपास पुर्ण.

फेरतपास – काहीही नाही.

समक्ष

Digitally signed by KAILAS PARASRAM DAWANE
Date: 2026.02.09 17:21:56 +0530

मारेगांव. (के.पी. दवने)

दिनांकः ०९/०२/२०२६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मारेगाव,

जिल्हा यवतमाळ.